# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## ( शिक्षण विभाग )

क्र. /1086/ शि.वि. / 2013. दि. 30/ 09 / 2013.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
प्राथ./उच्च प्राथ. /माध्य. शाळा, म.न.पा., नागपूर.

**विषय :— ''स्वच्छ नागपूर , सुंदर नागपूर'' योजनेची अमंलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :— मा. महापौर व मा. आयुक्त यांचे निर्देशानुसार.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या नागपूर शहराच्या शतकोत्तर सूवर्ण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून दि. २ ऑक्टोंबर ते १० ऑक्टोंबर पर्यंत स्वच्छता आठवडा पाळायचे आहे. नागपूर शहर हे जागतिक किर्तीचे व्हावे याकरीता **''स्वच्छ नागपूर , सुंदर नागपूर''** ही योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या अंगी आपल्या शहराबद्दल आपुलकी वाढून हे शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याकरीता त्यांना प्रेरणा मिळेल. याकरीता खालील उपक्रमांचे आयोजन मा. सहा. आयुक्त यांच्या सहकार्याने करावे.

१) शालेय परिसरात स्वच्छतेबद्दल जनसामान्यात जाणीवजागृती करण्याचे दृष्टीने प्रभातफेरीचे आयोजन करावे.यात शाळा समिती सदस्य, मा. नगरसेवक, जेष्ठ नागरीक, यांचा सहभाग घ्यावा.
२) शाळेत वर्ग सजावटीची स्पर्धा घेवून उत्कृष्ठ वर्ग सजावटीला पुरस्कृत करण्यात यावे.
३) वर्गनिहाय स्वच्छतेवर आधारित चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा , वकृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करावे.
४) झोनमध्ये स्वास्थ अधिकारी यांचे स्वच्छता व आरोग्य विषयक माहितीपर व्याख्यान शाळेत आयोजित करावे.
५) शालेय परिसर स्वच्छ व सुंदर ठेवून वृक्ष लागवड करावी.
६) विद्यार्थ्यांच्या घरचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवून परिसरात घाण व पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. जेणेकरून डास, किटकांची उत्पत्ती टाळून डेंगू सारख्या रोगांना आळा घालता येईल.
७) शालेय परिसर स्वच्छतेबाबत काही समस्या असल्यास सहा. आयुक्त यांच्या मदतीने त्वरीत सोडविण्यात यावे.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका नागपूर

प्रतिलिपी :—

1) मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर.
2) मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर

PC:2/D:\Tembhurne sir \ Letter 1.doc